सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २२३ | बुधवार, दि. ०६ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. राजेश नांढा
आयडीयल टेलर, अमळनेर



श्री. रणजीत पाटील
अमळनेर



ॲड. शिवकुमार ससाणे
अमळनेर



प्रा. जयश्री दाभाडे-साळुंखे
पत्रकार, अमळनेर



श्री. बाळासाहेब पाटील
सामाजिक कार्यकर्ते, अमळनेर

## कलिंगडासोबत चुकूनही खाऊ नका

### हे पदार्थ पचनावर करू शकतात वाईट परिणाम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण काय खातो आणि कशासोबत खातो, यावर विचार करण्यास भाग पाडले आहे. कलिंगड हे आरोग्यासाठी उत्तम असले, तरी ते चुकीच्या पदार्थांसोबत खाल्ल्यास पोटात आंबण्याची प्रक्रिया होऊन विषारी घटक तयार होऊ शकतात.उन्हाळ्याच्या सुट्ट्या आणि वाढता पारा यापासून सुटका मिळवण्यासाठी आपण अनेकदा थंड फळांचा आधार घेतो. बाजारात गेल्यावर लालचुटूक कलिंगड दिसले की कोणाच्याही तोंडाला पाणी सुटते. शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी आणि थंडावा देण्यासाठी कलिंगड हे सर्वोत्तम फळ मानले जाते. पण, गेल्या काही दिवसांपूर्वी दक्षिण मुंबईतील पायधुनी परिसरातून एक हृदयद्रावक बातमी समोर आली आहे. एकाच कुटुंबातील ४ सदस्यांचा, ज्यात दोन लहान मुलांचा समावेश होता, अन्नातून विषबाधा झाल्यामुळे मृत्यू झाला असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. रिपोर्टमध्ये असे समोर आले की त्यांनी कलिंगड आणि बिर्याणीचे सेवन केले होते.या घटनेने संपूर्ण देशाला हादरवून सोडले असून, आपण काय खातो आणि कशासोबत खातो, यावर विचार करण्यास भाग पाडले आहे. कलिंगड हे आरोग्यासाठी उत्तम असले, तरी ते चुकीच्या पदार्थांसोबत खाल्ल्यास पोटात आंबण्याची प्रक्रिया होऊन विषारी घटक तयार होऊ शकतात. म्हणूनच, तुमची पचनसंस्था सुरक्षित ठेवण्यासाठी कलिंगडासोबत कोणते पदार्थ टाळावेत, याची ही महत्त्वाची यादी नक्की वाचा.कलिंगडातील पोषणमूल्ये प्रति १०० ग्रॅम कलिंगडामध्ये कॅलरीज ३०पाणी ९१%कार्ब्स ७.६ ग्रॅमसाखर ६.२ ग्रॅमप्रोटीन ०.६ ग्रॅम या व्यतिरिक्त यात लायकोपीन आणि सिट्रुलिन सारखी उत्तम वनस्पती संयुगे असतात, जी रक्तदाब कमी करण्यास आणि स्नायूंचा त्रास कमी करण्यास मदत करतात.पण असे असले तरी आता तज्ज्ञांनी कलिंगडसोबत काय खाऊ नये यासाठी इशारा दिला आहे. चला त्याबद्दल जाणून घेऊ आणि त्याला खाणे बंद करु.



### कलिंगडासोबत हे ४ प्रकारचे पदार्थ कधीच खाऊ नका –

१. उच्च प्रथिने असलेले पदार्थ कलिंगड हे पचायला अत्यंत हलके आणि वेगवान असते, तर मांस किंवा अंडी यांसारखी प्रथिने पचायला वेळ लागतो. जर तुम्ही बिर्याणी किंवा मांसाहारासोबत कलिंगड खाल्ले, तर पचनक्रियेत अडथळा निर्माण होऊन पोट फुगणे किंवा गंभीर पोटाचे विकार होऊ शकतात.

२. कलिंगड खाल्ल्यानंतर लगेच पाणी पिणे आपल्या घरातील वडीलधारी मंडळी नेहमी सांगतात की कलिंगड खाल्ल्यावर पाणी पिऊ नका. यामागे शास्त्रीय कारण आहे. कलिंगडात आधीच ९१ टक्के पाणी असते. वरून पाणी प्यायल्यास जठरातील पाचक रस पातळ होतात आणि पोटाची पीएच पातळी बिघडते. यामुळे अन्नाचे पचन नीट होत नाही. अगदी काकडीसारखी जास्त पाणी असलेली फळेही कलिंगडासोबत खाणे टाळावे.

३. दुग्धजन्य पदार्थ कलिंगड आणि दूध किंवा दही यांचे मिश्रण पोटासाठी घातक ठरू शकते. दुग्धजन्य पदार्थांना पचण्यासाठी ॲसिडची गरज असते, तर कलिंगडामधील पाणी पोटातील ॲसिड पातळ करते. या विरुद्ध गुणामुळे पचन मंदावते आणि पोटात गॅस किंवा उलट्यांचा त्रास होऊ शकतो.

४. आंबट फळे लिंबू, संत्री किंवा द्राक्षे यांसारखी आंबट फळे कलिंगडासोबत खाऊ नका. कलिंगड हे गोड आणि थंड प्रकृतीचे आहे, तर आंबट फळे पचनाच्या प्रक्रियेत अडथळा आणून अपचन निर्माण करू शकतात.आरोग्यदायी जीवनासाठी तज्ज्ञांचा सल्ला निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली केवळ हेल्दी खाण्यात नाही, तर योग्य पद्धतीने खाण्यात आहे.कलिंगड नेहमी स्वतंत्रपणे खाणे उत्तम.रात्री उशिरा कलिंगड खाणे टाळा.रस्त्यावरील कापून ठेवलेली फळे विकत घेऊ नका.जर तुम्हाला कोणत्याही अन्नाची ॲलर्जी असेल, तर आहारात बदल करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला नक्की घ्या.तुमचे आरोग्य ही तुमची स्वतःची जबाबदारी आहे. मुंबईतील दुर्दैवी घटना आपल्या सर्वांसाठी एक धडा आहे.

# दरवाढीचा धसका
# पंपांवर पुन्हा रांगा!

### पंपांवर 'नो स्टॉक'चे बोर्ड : साठेबाजीच्या भीतीने प्रशासनाची चिंता वाढली



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर : पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचा निकाल लागताच देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर अमळनेर शहर आणि ग्रामीण भागात सोमवारी , मंगळवारी सकाळपासूनच पेट्रोल पंपावर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. इंधन भेटणार नाही तसेच महागणार असल्याच्या चर्चेमुळे ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण असून, मागणी वाढल्याने आणि पुरवठा विस्कळीत झाल्याने अनेक पंपांवर नो स्टॉकचे फलक झळकले आहेत.**

पॅनिक बाइंगमुळे कृत्रिम टंचाई जाणकारांच्या मते, प्रत्यक्षात इंधनाचा तुटवडा नसून भीतीपोटी होणारी खरेदी वाढल्याने साठा संपत आहे. तेल कंपन्यांनी वितरणाचा वेग मंदावल्याने आणि ग्राहकांनी टँक फुल्ल करण्याच्या सपाट्यामुळे पंपावरील यंत्रणा कोलमडली आहे. अमळनेर शहरातील पेट्रोल पंपांवर सकाळपासून गर्दी आणि नो स्टॉक चे बोर्ड लागले आहेत.पोलीस यंत्रणेच्या उपस्थितीत पेट्रोल वाटप केले जात होते.

युद्धाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. मात्र, देशातील पाच राज्यांच्या निवडणुकांमुळे केंद्र सरकारच्या सूचनेनुसार तेल कंपन्यांनी दरवाढ रोखून धरली होती, असे जाणकारांचे मत आहे. आता निकाल जाहीर झाल्याने कंपन्या आपला तोटा भरून काढण्यासाठी प्रति लिटर १० ते १५ रुपयांपर्यंत वाढ करण्याची शक्यता आहे. तेल कंपन्यांना दररोज कोट्यवधी रुपयांचा फटका बसत असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. परिणामी, ही दरवाढ अटळ मानली जात आहे. सोमवार सकाळपासूनच शहरातील स्थिती गंभीर बनली. तेल कंपन्यांनीही पंपांना होणारे इंधन वितरण मर्यादित केल्याची चर्चा आहे.



अमळनेर : अंगारक संकष्ट चतुर्थीनिमित्त मंगळवार, दि. ५ मे रोजी सकाळच्या महाआरतीवेळी भाविकांनी केलेली गर्दी.

### अंगारक संकष्ट चतुर्थीनिमित्त
## श्री मंगळग्रह मंदिर फुलले

### विविध राज्यांसह महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांतील भाविकांकडून दर्शन, पूजेसाठी गर्दी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिर मंगळवार, दि. ५ मे रोजी अंगारक संकष्ट चतुर्थीनिमित्त देशातील विविध राज्यांसह महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांतील भाविकांच्या गर्दीने फुलल्याचे चित्र दिसून आले. निमित्त होते यंदाच्या अर्थात २०२६ या वर्षातील द्वितीय अंगारक योग असलेल्या संकष्ट चतुर्थीचे.

हिंदू धर्मात संकष्टी चतुर्थीला विशेष महत्त्व आहे. पण जेव्हा ही चतुर्थी मंगळवारी येते तेव्हा तिला 'अंगारकी चतुर्थी' म्हटले जाते. मंगळवार, दि. ५ मे रोजी यंदाच्या वर्षातील द्वितीय अंगारक संकष्ट चतुर्थी (वैशाख वद्य चतुर्थी) अत्यंत दुर्मिळ आणि शुभ योगासह आलेली असल्याने भाविकांनी दर्शन, पूजा अभिषेकासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. बरेच भाविक सोमवार, दि. ४ मे रोजीच रात्री उशिरापर्यंत श्री मंगळग्रह मंदिरात दर्शन, पूजा अभिषेकासाठी दाखल झाले होते. आज पहाटे ५.२५ वाजेपासूनच चतुर्थीचा प्रारंभ होणार असल्याने श्री मंगळग्रह मंदिरात फुलांची आकर्षकरित्या

पान २वर

### यंदा तीन अंगारक चतुर्थी

यंदा योगायोगाने तीन अंगारक चतुर्थी आहेत. पहिली ६ जानेवारी रोजी झाली. त्यानंतर दुसरी ५ मे रोजी झाली, तर तिसरी २९ सप्टेंबर २०२६ रोजी येणार आहे. यंदा अंगारकी संकष्टी चतुर्थी तीन असण्याचे मुख्य कारण पंचांगानुसार ग्रह-नक्षत्रांची विशेष स्थिती आणि मंगळवार व चतुर्थी तिथीचा योगायोग हे आहे.

### दिनविशेष
६ मे

- महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांमध्ये महिलांसाठी तीस टक्के आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला.
- भूपिंदर नाथ किरपाल यांनी भारताचे ३१ वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

## साडीमुळे लाखोंचो चोरी उघड; बाणेरमध्ये फिल्मी ट्विस्ट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीचं प्रमाण वाढत चाललं आहे. अशातच पुण्यात एक मोठी घटना उघडकीस आली आहे. या घटनेनं शहरात एकच खळबळ उडाली आहे.पुण्यातल्या बाणेर परिसरात एकदम फिल्मी वाटावा असा प्रकार घडलाय. घरात कामाला असलेली मोलकरीण आणि घरमालकिणीमध्ये झालेल्या एका छोट्याशा संशयाने तब्बल साडेचौदा लाखांचे दागिने आणि महागडी साडी चोरीचा पर्दाफाश केला आहे.

हा सर्व प्रकार सुरू झाला एका साडीपासून, घरातली २० हजार रुपये किंमतीची सिल्क साडी अचानक गायब झाली. घरमालकिणीला आधी वाटले की कुठेतरी ठेवली असेल, पण काही दिवसांनी तीच साडी मोलकरणीने नेसून थेट व्हॉट्सॲप स्टेटसवर टाकली, आणि इथेच मालकिणीला संशय आला आणि इथे मोलकरणीचा डाव फसला.घरमालकिणीने स्टेटस पाहिले आणि डोक्यात लगेच ट्यूब पेटली. अरे ही साडी तर माझीच आहे! असा विचार येताच तिने मोलकरणीला जाब विचारला. पण तिकडून सरळ उत्तर न देता उडवाउडवीची बोलणी सुरू झाली. इथेच घरमालकिणीला पूर्ण संशय आला आणि तिने लगेच तिला कामावरून काढून टाकले. पण गोष्ट इथेच थांबली नाही. काही दिवसांनी घरात तपास करताना अजूनच धक्कादायक गोष्टी समोर आल्या. किचनच्या ओट्याखाली पाण्याची बाटली, तेल आणि काही इतर वस्तू सापडल्या.



घरमालकिणीने दावा केला की या वस्तू तिथे मुद्दाम ठेवलेल्या असून त्यामागे काळी जादू करण्याचा हेतू आहे.आता घरमालकिणीचा संशय अजूनच बळावला. तिने थेट बाणेर पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार दाखल केली. पोलिसांनीही प्रकरण गंभीर घेतले असून तपास सुरू केला आहे. मोलकरणीने नेमके किती आणि काय-काय घेतले, हे शोधण्याचे काम आता पोलिसांच्या हातात आहे. बाणेर परिसरात या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे. स्टेटसनेच चोर पकडला, अशी भन्नाट कमेंट लोक करत आहेत.





श्री. बाळासाहेब पाटील
(सामाजिक कार्यकर्ते)
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
श्री. विकास पाटील
(भगवती टी हाऊस, अमळनेर)





श्री. राजेश नांढा
अमळनेर
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...



* शुभेच्छुक *
श्री. जितेंद्र जैन
व्हा. चेअरमन, खा. शि. मंडळ, अमळनेर

## संपादकीय

### आश्वासनांचे आव्हान...!

तामिळनाडूपासून केरळ आणि बंगालपर्यंत बदलाची लाट पसरली आहे, आता आश्वासने पूर्ण करण्याची वेळ आली आहे.आसाम आणि पुदुचेरी या केंद्रशासित प्रदेशाचा अपवाद वगळता, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालांमधून एकंदर संदेश हाच मिळतो की मतदारांना बदल हवा आहे. अभिनेते,राजकारणी जोसेफ विजय चंद्रशेखर (जे विजय या नावाने लोकप्रिय आहेत) यांनी दोन वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या तामिळनाडू वेटी कळघम या पक्षाचे यश हे याचे उत्तम उदाहरण आहे.टीव्हीकेने केवळ तामिळनाडूच्या दोन सर्वात जुन्या राजकीय पक्षांना, म्हणजेच सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघम आणि ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम यांनाच मोठे आव्हान दिले नाही, तर तो सर्वात मोठा पक्ष म्हणूनही उदयास आला.विजय यांनी आपल्या प्रचंड स्टार प्रतिमेचा आणि शक्तीचा वापर करून एक परिवर्तनकारी पर्याय सादर केला. त्यांनी रोख रक्कम आणि सोने यांसारख्या भरघोस भेटवस्तू, तसेच महिला आणि तरुण मतदारांना लक्ष्य करून शिष्यवृत्ती जाहीर केली. या सर्वांमुळे मोठ्या संख्येने मतदान झाले. केरळमधील मतदारांनी दोन प्रस्थापित राजकीय आघाड्यांमध्ये अदलाबदल करत आपल्या पारंपरिक प्रवृत्तीकडे परतणे सुरूच ठेवले आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीने पिनारयी विजयन यांच्या डाव्या लोकशाही आघाडीचा ऐतिहासिक दोन टर्मचा विजय मोठ्या फरकाने उलथवून टाकला.सत्ताविरोधी लाटेचे सर्वात ठळक उदाहरण पश्चिम बंगालमधून समोर आले, जिथे भारतीय जनता पक्षाने १५ वर्षांनंतर ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसला सत्तेतून बाहेर काढण्याचे आपले स्वप्न अखेर पूर्ण केले. राज्यात दोन्ही टप्प्यांत विक्रमी मतदान झाले. मतदानाची टक्केवारी आणि विजयाचे प्रमाण या दोन्हीवरून हे स्पष्ट होते की, वादग्रस्त विशेष सखोल पुनरावलोकनाने निवडणुकीच्या निकालांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली नाही.तृणमूल काँग्रेसने याला आपल्या निवडणूक प्रचाराचा केंद्रबिंदू बनवून चुकीचा अंदाज बांधला. परंतु यामुळे ममता बॅनर्जी यांच्या राजवटीचे अस्थिर स्वरूप कमी होण्यास फारसा हातभार लागला नाही. गुंतवणुकीतील स्थिरता, पक्षांतर्गत वाढता भ्रष्टाचार, महिलांच्या सुरक्षेबद्दल सहानुभूतीचा अभाव आणि वाढता राजकीय हिंसाचार या सर्वांनी तरुण मतदार आणि महिलांना पक्षापासून दुरावण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.यामध्ये तृणमूल काँग्रेस सरकारने आयुष्मान भारत आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसारख्या केंद्रीय योजनांना केलेल्या विरोधानेही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असावी. अल्पसंख्याकांना सुरक्षित मतपेढी म्हणून खूश करण्याचे ममता बॅनर्जींचे धोरणही त्यांच्यावरच उलटले आणि भाजप एक विश्वासार्ह पर्याय म्हणून उदयास आला. अनेक मुस्लिमबहुल मतदारसंघांमध्ये भाजपने लक्षणीय मुसंडी मारली आहे, हे ममता बॅनर्जींच्या प्रशासकीय कामगिरीबद्दल बरेच काही सांगून जाते.

एकदा अंतिम निकाल जाहीर झाल्यावर, प्रशासनाचे प्रत्यक्ष कामकाज भविष्यातील सरकारांच्या क्षमतेची कसोटी घेईल. तामिळनाडूमध्ये, जिथे टीव्हीकेला सरकार स्थापन करण्यासाठी मित्रपक्षांची गरज भासण्याची शक्यता आहे, तिथे विजय यांच्या लक्षात येऊ शकते की मोठे कर्ज आणि वित्तीय दबावांमुळे त्यांच्या कल्याणकारी योजनांच्या उदारतेवर मर्यादा येऊ शकतात. त्यांच्या आश्वासनांमध्ये महिलांसाठी ₹२,५०० चा मासिक भत्ता, गरीब महिलांसाठी विवाह सहाय्य (सोन्याच्या आणि रेशमी साड्या), मोफत स्वयंपाकाचा गॅस, वाहतूक आणि स्वच्छता उत्पादने, शिष्यवृत्ती, प्राथमिक शिक्षणासाठी कर्ज आणि बरेच काही समाविष्ट होते.

केरळमधील मुख्य आव्हान म्हणजे आखाती देशांमध्ये नोकऱ्या आणि परदेशातून येणाऱ्या पैशांमध्ये (रेमिटन्स) झालेल्या घसरणीमुळे निर्माण झालेले तात्काळ संकट हाताळणे, ज्यामुळे राज्याच्या आर्थिक विकासाचा आणि रोजगाराचा अभाव बऱ्याच काळापासून झाकोळला गेला होता. पश्चिम बंगालसारख्या बहुलवादी संस्कृती असलेल्या देशात, भाजपच्या विकास अजेंड्याची आता बंगाली समाजातील उघड जातीय ध्रुवीकरणाच्या पार्श्वभूमीवर कसोटी लागणार आहे. या परस्परविरोधी शक्तींमध्ये संतुलन साधण्यासाठी जमीन कायद्यांमध्ये बदल करणे, अनेक दशकांपासून सुरू असलेल्या राजकीय हिंसाचाराला आळा घालणे आणि अनेक दशकांनंतर राज्याला व्यवसाय-स्नेही बनवणे आवश्यक असेल. राजकीय पक्षांनी भूतकाळात अनुभवल्याप्रमाणे, निवडणुका जिंकणे आणि सरकार स्थापन करणे यामधील दरी सांधणे हे एक आव्हानात्मक काम असू शकते.

# नेता झालेला अभिनेता थलपतीचा

# महा विजय ...!



## बालकलाकार म्हणून चित्रपटसृष्टीत

विजयने वयाच्या १० व्या वर्षी १९८४ च्या वेत्री या तमिळ चित्रपटातून बालकलाकार म्हणून तमिळ चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. १९९२ मध्ये वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनी मुख्य अभिनेता म्हणून चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी पूवे उनाक्कागा (१९९६), लव्ह टुडे (१९९७), कधालुक्कू मरियाधाई (१९९७), थुल्लाथा मनामुम थुल्लम (१९२०९), आणि कुल्यावल्म (१९२०९), आणि कुल्यावाल्या (१९९०) यांसारखे हिट चित्रपट दिले. मित्र (२००१). थिरुमलाई (२००३) आणि घिल्ली (२००४) सारखे चित्रपट विजयसाठी व्यावसायिक हिट ठरले. तथापि, तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुकीसाठी त्यांनी दिलेल्या प्रतिज्ञापत्रात, ६९ चित्रपटांमध्ये दिसल्यानंतर विजयची एकूण संपत्ती ₹६०३.२० कोटी आहे. विजयच्या बँक खात्यात २१३ कोटी रुपयांची बचत आहे. त्याच्याकडे बीएमडब्ल्यू ५३०, टोयोटा लेक्सस आणि टोयोटा वेलफायर यांसारख्या गाड्यांचा संग्रह असून, या सर्वांची किंमत ८ कोटी रुपयांपर्यंत आहे. चेन्नईमध्ये त्याचा ७०-८० कोटी रुपयांचा एक बंगलाही आहे. विजयने 'जन नायकन'साठी १००-१२० कोटी रुपये, तर २५० कोटी रुपये मानधन घेतले होते.

## किंगमेकर थलपती विजयचे शिक्षण

अभिनयाकडून राजकारणाकडे वळलेल्या विजयने चेन्नईतील नामांकित महाविद्यालयात प्रवेश घेतला होता, मात्र एका स्वप्नासाठी त्याने शिक्षण अर्धवट सोडले. तमिळ सुपरस्टार आणि राजकारणी थलपती विजय याचे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे.विजयने त्याचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण चेन्नईतील फातिमा मॅट्रिक्युलेशन हायर सेकंडरी स्कूल आणि बाललोक मॅट्रिक्युलेशन हायर सेकंडरी स्कूल इथून पूर्ण केले.विजयने १९८९ आणि १९९१ मध्ये अनुक्रमे १० वी आणि १२ वीचे शिक्षण पूर्ण केले.त्यानंतर विजयने चेन्नईतील प्रसिद्ध लोयोला कॉलेजमध्ये व्हिज्युअल कम्युनिकेशन या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता. मात्र, अभिनयाची आवड आणि चित्रपटांच्या शूटिंगमुळे त्याने पदवीचे शिक्षण पूर्ण केले नाही.विजयने वयाच्या १८ व्या वर्षीच मुख्य अभिनेता म्हणून सिनेसृष्टीत पदार्पण केले होते.

*दक्षिणेत अभिनेत्यांना देवासमान मानण्याची परंपरा राहिलेली आहे. अक्षरश: तेथील जनतेने कटआऊटस् लावण्यासह मंदिरेही उभारल्याचे सर्वज्ञात आहे. त्यात एन.टी. रामाराव यांचा बऱ्याच काळ बोलबाला राहिला. त्यानंतर कमल हसन, रजनीकांत यांनाही लोकांनी डोक्यावर घेतले. मात्र ते राजकारणाच्या पटलावर प्रभाव दाखवू शकले नाही. मात्र थलपती विजय यांनी कळस गाठत खरोखर थलपती म्हणजेच 'सेनापती' म्हणून निवडणुकीत 'टीव्हीके'च्या माध्यमातून अधिराज्यच अधोरेखित झाल्याचे दिसून येत आहे.*

# विजयला सगळे 'थलपती' का म्हणतात?

## अजब विजयची गजब प्रेमकहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेता थलपती विजयच्या टीव्हीके पक्षाला मोठे यश मिळालं आहे. विजयने २ फेब्रुवारी २०२४ रोजी 'तमिळगा वेत्री कळघम' पक्षाची स्थापना केली होती. या निवडणुकांसाठी तो गेली दोन वर्षे तयारी करत होता. जोसेफ विजय चंद्रशेखर हे थलपतीचं मूळ नाव. तामिळनाडूच्या निकालाची सध्या संपूर्ण देशभरात चर्चा होत आहे. याठिकाणी सत्तापालट होऊन आता थलपतीचा मोठा विजय झाल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. आता अभिनेत्याचं मूळ नाव जोसेफ विजय असले, तरी फॅन्स त्याला थलपती म्हणून ओळखतात. आता अनेकांना प्रश्न पडला असेल...

**थलापतीच्या वैयक्तिक आयुष्याची चर्चा**

निवडणूक सुरू असतानाच त्याच्या पत्नीने घटस्फोटासाठी अर्ज केला होता.थलापती विजयच्या पत्नीचे नाव संगीता सोर्लिंगम असे आहे. ती एक श्रीलकेतील तमिळ कुटुंबातील आहे. या दोघांचा प्रेमाविवाह आहे. २५ ऑगस्ट १९९९ रोजी त्यांनी लग्न केले. विशेष म्हणजे या दोघांना संजय नावाचा मुलगा आणि दिव्या नावाची मुलगी आहे. विजय धर्मान ख्रिश्चन तर संगीता ही हिंदू आहे. त्यामुळे त्यांनी दोन्ही धार्मिक पद्धतीने विवाह केला होता. परंतु आता या दोघांमध्ये दुरावा निर्माण झाल्याचे बोलले जात होते.दोघांच्याही नात्यात दुरावा निर्माण झाल्याचे सांगितले जात असताना आता संगीताने घटस्फोटासाठी अर्ज केल्याचे समोर आले आहे. दुसरीकडे विजय आणि संगीता यांच्यात आलबेल नसल्याची चर्चा सुरू असतानाच विजय आणि अभिनेत्री कीर्ति सुरेश यांच्यातील जवळकीचीही सर्वत्र चर्चा होऊ लागले. विजय आणि कीर्ति यांनी सोबत सरकार, भैरवा यासारखे चित्रपट केले आहेत. संगीता आणि विजय यांच्यातील वितुष्टाचे मुख्य कारण कीर्ति सुरेश असल्याचे बोलले जाते. या नात्याबद्दल कीर्ति सुरेश किंवा विजय यांनी कधीही उघड भाष्य केलेले नाही.परंतु विजय आणि तृषा कृष्णन यांच्यात मात्र खूप जवळीक असल्याचे बोलले जाते. तामिळनाडूच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. या निवडणुकीत विजयाच्या पक्षाने विजयी मुसंडी मारली आहे. तृषा कृष्णन हिचा वाढदिवस होता. या विजयी उत्सवात तृषा कृष्णन ही विजयाच्या घरी गेल्याचे पाहायला मिळाले. तिने विजयला शुभेच्छा दिल्या आहेत.



**थलपती म्हणजे काय?**

थलपती हा एक तमिळ शब्द आहे. एखाद्या गटाचा, सैन्याचा किंवा जनतेच्या नेत्याला संबोधण्यासाठी थलपती हा शब्द वापरला जातो. सोप्या भाषेत सांगायचे झाले, तर थलपती या तमिळ शब्दाचा अर्थ सेनापती, प्रमुख किंवा नेता असा होतो. त्याने करिअरच्या सुरुवातीच्या दोन वर्षांतच १२ चित्रपटांमध्ये काम केले, तसेच यापैकी ६ चित्रपटांचं दिग्दर्शक सुद्धा केले होते. अभिनेत्याचे वडील एस. ए. चंद्रशेखर यांनी रसिगन नावाच्या चित्रपटाची निर्मिती केली होती. यानंतर विजयला त्याच्या वडिलांनी १९९४ मध्ये इलयाथलपती ही पदवी / टायटल दिले, ज्याचा अर्थ होता तरुण नेता. कालांतराने इलयाथलपतीवरून त्याला सगळे थलपती विजय म्हणू लागले.



## आई-वडिलांच्या लग्नाचे विजय साक्षीदार

वडील चंद्रशेखर ख्रिश्चन होते, तर त्याची आई शोभा हिंदू होती. शोभा एक लोकप्रिय पार्श्वगायिका होत्या, चंद्रशेखर यांनी शिवाजी गणेशन यांना सांगितले की त्यांना शोभा आवडते आणि त्यांना तिच्याशी लग्न करायचे आहे. शिवाजी गणेशन आणि त्यांच्या कुटुंबीयांनी या नात्याला संमती दिली. लग्नाच्या दिवशी, शिवाजी गणेशन यांच्या पत्नी, कमला अम्माल यांनी शोभा यांना मंगळसूत्र दिले. चित्रपटसृष्टीच्या प्रेमाच्या आणि आशीर्वादाने त्या दोघांनी लग्न केले. त्या जोडप्याने पुढच्याच वर्षी १९७४ मध्ये जोसेफ विजय (थलपथी विजय) यांचा जन्म झाला. केले. हे आंतरधर्मीय लग्न होते, पण धर्माने त्यांच्या नात्यात कधीही अडथळा आणला नाही. तमिळ टाइम्स नाऊच्या वृत्तानुसार, जेव्हा विजय सहा वर्षांचा झाला, तेव्हा शोभा यांच्या विनंतीवरून त्यांनी चर्चमध्ये दुसऱ्यांदा लग्न केले. त्यावेळचा एक कृष्णधवल फोटो आजही सोशल मीडियावर व्हायरल होतो. या अनोख्या लग्नात त्यांचा मुलगा विजयही उपस्थित होता.

## श्री मंगळग्रह मंदिर फुलले

पान १ वरून




सजावट करण्यात आलेली होती. त्यात या मुहूर्तावर श्री मंगळग्रह देवासह प्रारंभी पहाटे पाचच्या सुमारास श्री गणपती बाप्पा, पंचमुखी हनुमानजी आणि श्री मंगळग्रह देवता यांचे यजमानांच्या शुभ हस्ते विधिवत विशेष पूजन करण्यात आले. त्यानंतर भाविकांनी मंदिर परिसरातील भगवान श्री गुरुदत्त भगवान-श्री अनघालक्ष्मी माता तसेच श्री कालभैरवनाथ-श्री माता भैरवी यांचे तसेच श्री स्वामी समर्थ महाराज व मंगळेश्वर महादेवांचेही दर्शन घेतले. ही चतुर्थी बुधवार, दि. ६ मे २०२६ रोजी सकाळी ७.५१ वाजेपर्यंत आहे. त्यामुळे ही अंगारकी अहोरात्र आहे. या दिवशी शिवयोग आणि बुधादित्य योग जुळून आलेले असल्याने हा दिवस भाविकांसाठी अधिक फलदायी मानला गेला. या दिवशी उपवास केल्याने वर्षभरातील सर्व (२१) संकष्टी चतुर्थींचे पुण्य लाभते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. आजच्या दिवशी रात्री चंद्रोदयाची वेळ १०.३५ च्या सुमारास होती. त्यामुळे अनेक भाविकांनी चंद्रोदयानंतर चंद्राला अर्घ्य देऊनच उपवास सोडल्याचे पाहावयास मिळाले.

# तमिळनाडूतही 'लाडक्या बहिणी'चा करिष्मा

## ७ प्रभावी आश्वासनांनी फिरवले राजकारण

**तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीत अभिनेता थलपती विजय यांच्या 'तमिळगा वेत्री कळगम' या पक्षाने राजकीय विश्लेषकांचे सर्व अंदाज मोडीत काढले आहेत. या यशामागे महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण' योजनेच्या धर्तीवर विजय यांनी दिलेली ७ मोठी आश्वासने गेमचेंजर ठरल्याचे बोलले जात आहे.**

१. तामिळनाडूमधील गृहिणींना दरमहा २५०० रुपये देण्याचे आश्वासन दिले. तसेच सुशिक्षित पदवीधरांना ४०० रुपये आणि डिप्लोमा धारकांना २५०० रुपये बेरोजगारी भत्ता जाहीर करून तरुणांना आकर्षित केले. इंटर्नशिपसाठी ५००० ते ८००० रुपयांचं विद्यावेतन आणि पाच लाख तरुणांसाठी १८००० रुपयांची रोजगार संबंधित सहाय्यता योजनेचे देखील त्यांनी आश्वासन दिले.

२. वाढत्या महागाईच्या काळात प्रत्येक कुटुंबाला वर्षाला ६ एलपीजी सिलिंडर मोफत देण्याचे अन्नपूर्णा सुपर सिक्स योजनेतील आश्वासन महिला मतदारांच्या मनाला भिडल्याचे बोलले जात आहे.

३. याव्यतिरिक्त विजय यांनी अण्णन सीर थिट्टम योजनेदरम्यान बहिणी आणि मुलींच्या लग्नासाठी ८ ग्रॅम सोने आणि रेशमी साड्या दान करण्याचे वचन दिले.

४. पहिली ते बारावीपर्यंत शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला दरवर्षी १५ हजार रुपयांची शैक्षणिक मदत देण्याची घोषणा केली.

५. महिलांचा प्रवास सुकर आणि स्वस्त व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून मोफत प्रवासाचे आश्वासन

६. ज्येष्ठ नागरिक, विधवा आणि दिव्यांग व्यक्तींसाठी दरमहा ३००० रुपये पेन्शन देण्याचे आणि या योजनेचा लाभ १५ लाख नवीन लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे वचन दिले.

७. मूलभूत सुविधांअंतर्गत प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी २०० युनिट मोफत वीज, नळाद्वारे पिण्याचं पाणी आणि सहा मोफत एलपीजी सिलिंडर देण्याचं आश्वासन दिले. मजुरांसाठी, अंगणवाडी सेविकांना १८००० रुपये, स्वच्छता कर्मचाऱ्यांना १० हजार रुपये देण्याचा प्रस्ताव देखील मांडण्यात आला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# पाच हजारांत कंपनी सुरू, अशी आहे केंट आरओच्या उदयाची कहाणी

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पैसे कमावण्यासाठी तीक्ष्ण नजर लागते. आजकाल लोक नवनवीन व्यावसायिक कल्पना घेऊन येत आहेत आणि त्यातून करोडोंची कमाई करत आहेत. लोक हवा आणि पाणी विकूनही पैसे कमवत आहेत.आज आम्ही तुम्हाला अशाच एका व्यावसायिकाची कहाणी सांगणार आहोत, ज्यानी एका साध्या कल्पनेतून आपला व्यवसाय सुरू केला आणि आज त्यांचे करोडोंचे साम्राज्य आहे. त्यांची कहाणी खूप प्रेरणादायी आहे.

श्री.महेश गुप्ता, ज्यांनी आयआयटी कानपूरमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांना इंडियन ऑइल या सरकारी कंपनीत नोकरी मिळाली. मात्र, दुसऱ्या कोणाच्या हाताखाली काम करण्याऐवजी त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा होता.पण कुठून सुरुवात करावी हे त्यांना नक्की माहीत नव्हते. काम करत असताना, त्यांना एका समस्येचा सामना करावा लागला, ज्यामुळे त्यांना नोकरी सोडावी लागली. त्यांचा मुलगा आजारी पडला. आपल्या मुलांच्या आजारपणामुळे, त्यांना एक अशी समस्या दिसली, ज्यामुळे ते उपायाच्या शोधात निघाले आणि येथूनच केंट आरओची सुरुवात झाली. महेश यांचा जन्म २४ सप्टेंबर १९५४ रोजी दिल्लीत झाला. ते एका सामान्य कुटुंबातील होते. त्यांचे वडील अर्थ मंत्रालयात सेक्शन ऑफिसर होते. त्यांना पाच भावंडे होती. ते आपल्या संपूर्ण कुटुंबासह एका लहान घरात राहत होते. त्यांनी आपले शालेय शिक्षण लोधी रोड येथे पूर्ण केले. अभ्यासाच्या आवडीमुळे त्यांनी आयआयटी कानपूरमध्ये प्रवेश घेतला. मेकॅनिकल इंजिनिअरिंग पूर्ण केल्यानंतर, त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियममधून पदव्युत्तर पदवी मिळवली. यामुळे त्यांना इंडियन ऑइलमध्ये नोकरी मिळाली. महेश यांची नोकरी चांगली होती, पण त्यांना स्वतःचा काहीतरी व्यवसाय करायचा होता. खूप विचारविनिमय केल्यानंतर, त्यांनी १९८८ मध्ये नोकरी सोडली. त्यांनी ऑइल मीटरचा व्यवसाय सुरू केला आणि नोएडामध्ये एक प्लांट उभारला. दरम्यान, त्यांची मुले आजारी पडू लागली, त्यांना वारंवार कावीळ होऊ लागली. जेव्हा ते डॉक्टरांकडे गेले, तेव्हा त्यांना सांगण्यात आले की याचे कारण दूषित पाणी आहे. आता ते दूषित पाण्याच्या समस्येवर उपाय शोधू लागले. हाच तो काळ होता जेव्हा त्यांना केंट आरओ सुरू करण्याची प्रेरणा मिळाली.

बाजारात वॉटर प्युरिफायर उपलब्ध होते, जे महेशने वापरूनही पाहिले, पण ते समाधानी नव्हते. त्यांच्या लक्षात आले की, सध्याचे वॉटर प्युरिफायर आरओ यूव्ही तंत्रज्ञानावर आधारित होते, ज्यामुळे ते पाणी पूर्णपणे स्वच्छ करू शकत नव्हते. महेशने आपल्या अभियांत्रिकी बुद्धीने काहीतरी वेगळे करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी रिव्हर्स ऑस्मोसिसवर आधारित स्वतःचा प्युरिफायर विकसित करण्याची कल्पना मांडली. ही कल्पना यशस्वी झाली. १९९८ मध्ये, त्यांनी आपली स्वतःची कंपनी, केंट आरओ सुरू केली. महेश गुप्ता यांनी आपली कंपनी केवळ ५,००० रुपयांमध्ये सुरू केली. त्यांनी आपल्या आरओची किंमत २०,००० रुपये ठेवली, जी बाजारातील इतर आरओपेक्षा जास्त होती. असे असूनही, त्याची वैशिष्ट्ये पाहून लोकांनी त्यावर विश्वास ठेवला. त्यांनी त्याच्या मार्केटिंगवर पैसे खर्च केले आणि हेमा मालिनी यांना ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून करारबद्ध केले. त्यांनी आयपीएलचे प्रायोजकत्वही स्वीकारले. हळूहळू, जसजसे मार्केटिंग वाढत गेले, तसतसे लोक कंपनीला ओळखू लागले. आज त्यांनी १,१०० कोटी रुपयांचे साम्राज्य उभे केले आहे.



# तू एक व्यावसायिक क्रिकेटपटू आहेस तरी...

## गावसकर बुमराहवर जाम भडकले, नेमके काय झाले?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुंबई इंडियन्सचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहसाठी यंदाचा आयपीएल २०२६ हंगाम हा एका वाईट स्वप्नासारखा ठरत आहे. तो वाईट गोलंदाजी करत नसतानाही त्याच्या विकेट्सची पाटी मात्र कोरीच रहू लागली आहे. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी जसप्रीत बुमराह प्रत्येक सामन्यात जोर लावून गोलंदाजी करत आहे. मात्र त्याला त्याच्या लौकीकास साजेसा खेळ करता येत नाही. एवढेच काय तर आता जसप्रीत बुमराहचे सामन्यात नो बॉल टाकण्याचे प्रमाण देखील वाढले आहे. त्यावरून गावसकर यांनी त्याचे चांगलेच कान उपटले.

### विकेट नाही ते नाही आता...

३२ वर्षांच्या जसप्रीत बुमराहने आयपीएल २०२६ मध्ये आतापर्यंत आठ नो बॉल टाकले आहेत. विशेष म्हणजे सोमवार, दि. ४ मे रोजी रात्री लखनौ सुपरजायंट्सविरुद्धच्या सामन्यात तर त्याने ३ नो बॉल टाकले. यावरूनच भारताचे माजी कर्णधार सुनील गावसकर जसप्रीत बुमराहवर जाम भडकले. बुमराहने १४ व्या षटकात दोन नो बॉल टाकल्यानंतर गावसकर यांनी बुमराहला चांगलेच फैलावर घेतले.

सुनील गावसकर यांनी टी-२० क्रिकेटमध्ये नो बॉल टाकणे कदापी समर्थनीय नाही. तुम्हाला अजून व्यावसायिकपणा दाखवता आला पाहिजे. बुमराहने हिम्मत सिंहला बाद केले. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. पंचांनी तो नो बॉल असल्याचा इशारा केला. याच हिम्मत सिंहने लखनौसाठी ४० धावा केल्या अन् संघाला २२० धावांचा टप्पा पार करून दिला.

याबाबत गावसकर म्हणाले, की जसप्रीत बुमराहने नो बॉल टाकला हे मला सांगू नका. ते कदापी मान्य नाही. कधीच मान्य होणार नाही. तू एक व्यावसायिक क्रिकेटपटू आहेस. त्यामुळे हे स्वीकारार्ह नाहीच. वाईड बॉल... मी समजू शकतो. मात्र नो बॉल अजिबात नाही. गावसकरांनी समालोचन करत असताना दिग्गज बुमराहचे असे कान टोचले.

जसप्रीत बुमराहने १४ व्या षटकात सलग दोन नो बॉल टाकले. त्यानंतर कॅमेरा मुंबईचे प्रमुख प्रशिक्षक महेला जयवर्धनेवर पॅन झाला. तेथे लसित मलिंगा देखील होता. ते बुमराहच्या नो बॉलनंतर निःशब्द होते.

ज्यावेळी कॅमेरा मलिंगावर पॅन झाला त्यावेळी गावसकर म्हणाले, की होय. बॉलिंग कोच हा खूप मोठा नो बॉल आहे. बुमराहला कोणतीही विकेट घेता आलेली नाही. लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात बुमराहला विकेट घेता आलेली नाही. त्याने चार षटकांत ४५ धावा दिल्या. यंदाच्या हंगामातील आतापर्यंतची त्याची कामगिरी पाहिली तर त्याने १० सामन्यांत फक्त ३ विकेट्स घेतल्या आहेत. बुमराहसाठी हा आयपीएल हंगाम अत्यंत वाईट गेला आहे.

# तीन बायका, असंख्य गर्लफ्रेंड अन् लक्झरी

## करोडपती शिपायाचा नाद खुळा; लाइफस्टाइल वाचून व्हाल थक्क!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

असे म्हटले जाते, की प्रेम माणसाकडून अशा गोष्टी करून घेते ज्याचा त्याने कधी विचारही केलेला नसतो. पण पिलीभीतच्या एका साध्या शिपायाने प्रेमाच्या नादात चक्क सरकारी तिजोरीवरच डल्ला मारला. तीन पत्नी, अनेक प्रेयसी, महागडे फ्लॅट्स, जमिनी आणि लक्झरी लाइफस्टाइल हे सर्व त्याने सरकारी पैशातून थाटले होते. शिक्षण विभागाच्या डीआयओस कार्यालयात तैनात असलेला शिपाई इल्हाम उर रहमान शम्सी याने सुमारे ८ कोटी रुपयांची अवाढव्य फसवणूक केली आहे.

इल्हाम हा चतुर्थ श्रेणी कर्मचारी होता. पण त्याचे राहणीमान एखाद्या मोठ्या श्रीमंतापेक्षा कमी नव्हते. 'जनता टेक्निकल इंटर कॉलेज'मध्ये लिपिक पदावर असताना त्याने डीआयओएस कार्यालयात चांगलीच पकड निर्माण केली होती. ट्रेझरी ऑफिसमधील तांत्रिक बाबींची खडान्खडा माहिती असलेल्या इल्हामने बनावट 'बेनेफिशियरी आयडी' तयार केले आणि सरकारी निधी स्वतःच्या आणि आपल्या जवळच्या लोकांच्या खात्यात वळवण्यास सुरुवात केली. तपासात समोर आले की, त्याने ५३ वेगवेगळ्या संशयास्पद खात्यांमध्ये ९८ व्यवहारांद्वारे ८ कोटी रुपयांहून अधिकचा अपहार केला.

एकट्या त्याच्या 'अर्शी खातून' नावाच्या पत्नीच्या खात्यात एक कोटी एक लाख रुपयांहून अधिक रक्कम पाठवण्यात आली होती. उर्वरित पैसे त्याच्या इतर पत्नी आणि प्रेयसींचे महागडे छंद पूर्ण करण्यासाठी वापरले गेले. त्याने फ्लॅट्स आणि जमिनी खरेदी करून अयाशीचे साम्राज्य उभे केले होते.

### सात महिलांना अटक

सप्टेंबर २०२४ पासून सुरू असलेल्या या मोठ्या घोटाळ्याचा पर्दाफाश झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केली. मुख्य आरोपी इल्हाम शम्सीच्या सात महिला साथीदारांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये लुबना, फातिमा, परवीन खातून, आशकारा परवीन, अजारा खान, नाहिद आणि आफिया खान यांचा समावेश आहे. इल्हामची पत्नी अर्शी खातून आधीच तुरुंगात आहे. अतिरिक्त पोलीस अधीक्षक विक्रम दहिया यांच्या माहितीनुसार, पोलिसांनी या खात्यांमधील पाच कोटी ५० लाख ५४ हजार ५९४ रुपये गोठवले (फ्रीज) आहेत.

इल्हाम शम्सीची ही कहाणी आता एखाद्या चित्रपटाच्या कथेसारखी वाटत आहे. एक साधा शिपाई इतक्या मोठ्या घोटाळ्याचा मास्टरमाइंड कसा बनला, हा आता तपासाचा विषय आहे. मात्र, प्रेमाच्या नावाखाली त्याने सरकारी तिजोरीची मोठी लूट केली हे स्पष्ट झाले आहे. सरकारी पैशाची एक-एक पाई वसूल केली जाईल आणि या प्रकरणातील कोणालाही सोडले जाणार नाही, असे पोलिसांनी सांगितले आहे.

# काळा मटका की लाल मटका?

## कोणत्या मटक्यातील थंड पाणी फायदेशीर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या उन्हाच्या झळांमुळे सर्वांनाच थंड पाणी गरजेचे असते. पण आरोग्याच्या दृष्टीने फ्रीजमधील पाणी हानिकारक ठरते. यामुळे अनेकजण मटक्यातील पाण्याला पंसती देतात. पण मटका खरेदी करताना हा प्रश्न पडतो की लाल मटका की काळा मटका घेणे योग्य. दोन्ही मटक्यांतील फरक समजावून घेऊ.

लाल मटका हा सामान्य मातीपासून बनवला जातो व याला भट्टीमध्ये भाजून तयार केले जाते. या मटक्यात लोहाचे प्रमाण चांगले असते. त्यामुळे लोहाची कमतरता असणाऱ्या लोकांना या मटक्यातील पाणी खूप फायदेशीर ठरते. तसेच लाल मटक्यात पाणी लवकर थंड होते. त्यामुळे पाणी ओतल्यानंतर खूप वेळ वाट पाहावी लागत नाही.

दुसरीकडे काळा मटका तयार करण्याची प्रक्रिया खूपच वेगळी असते, ही वेळखाऊ असते. यासाठी खास प्रक्रियेतून राख व धुरापासून याला बनवले जाते. याचा फायदा म्हणजे या पाण्यात बॅक्टेरिया तयार होत नाहीत. गॅस व ॲसिडिटीची त्रास असणाऱ्यांसाठी काळ्या मडक्यातील पाणी खूपच फायदेशीर ठरते. याचा पीएच ८ पॉईंट असतो. तसेच लाल मटक्याच्या तुलनेत काळा मटका हा पाणी खूप वेळ थंड ठेवतो. यामुळे खूप वेळासाठी पाणी पिण्यासाठी वापरता येते.



यामुळे एकूणच पाहता लाल मटक्यापेक्षा काळ्या मटक्याचे अनेक फायदे असल्याचे दिसून येते.

# रोज़ ३० मिनट टहलें, ज़िंदगी भर हेल्दी रहें!



रेगुलर टहलने से दिल की सेहत बेहतर होती है और हार्ट अटैक का खतरा कम होता है। तेज़ी से चलने से कैलोरी बर्न होती है और वज़न कंट्रोल में रहता है। खाने के बाद टहलने से ब्लड शुगर कंट्रोल होता है। टहलने से स्ट्रेस, एंग्जायटी और डिप्रेशन कम होता है। जोड़ और हड्डियां मज़बूत होती हैं और दर्द कम होता है। रोज़ टहलने से नींद की क्वालिटी बेहतर होती है। इम्यूनिटी बढ़ती है और बीमारियों से बचाव होता है। डाइजेशन बेहतर होने से शरीर ज़्यादा एक्टिव रहता है।

# लग्नानंतर सासरच्या घरासाठी शिकली मराठी

## जेनेलिया इतके शुद्ध कसे बोलते? 'हे' आहे तिचे सीक्रेट!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेनेलिया देशमुख हिने 'वेद' या चित्रपटातून तिच्या अस्खलित मराठीने प्रेक्षकांना प्रभावित केले. मूळची मराठी नसतानाही लग्नानंतर रितेश देशमुखच्या कुटुंबात राहताना तिने दैनंदिन संभाषण, सराव आणि मेहनतीच्या जोरावर मराठी भाषा आत्मसात केली.

जेनेलिया देशमुख हिने मराठी भाषेवर मिळवलेले प्रभुत्व सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. मूळची मराठी नसतानाही ती इतकी सहज आणि स्पष्ट मराठी बोलते, याचे कौतुक सर्वत्र होत आहे. वेड चित्रपटात तिला आपण मराठी बोलताना पाहिले आहे. अगदी सहज ती मराठी बोलताना दिसली. वेड या चित्रपटात तिच्या डायलॉगने प्रेक्षकांना विशेष भुरळ घातली. तिच स्पष्ट उच्चार, अचूकता आणि हावभाव, नैसर्गिक अभिनयामुळे ती 'खऱ्या मराठी अभिनेत्री'सारखी वाटली.

दुसरीकडे आता राजा शिवाजी हा चित्रपट रिलीज झाला आहे. यामध्ये अभिनेता, तिचा पती रितेश देशमुख आणि तिची मुख्य भूमिका आहे. या चित्रपटातील तिचे उत्तम मराठी डायलॉग्ज प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतात. प्रेक्षकांना डोळ्यांतून अश्रू आणण्यास भाग पाडणारे दृश्ये आणि उत्तम संवाद, उत्कृष्ट सहज सुंदर साकारलेला अभिनय सगळेच महत्वाचे ठरले आहे.

दाक्षिणात्य आणि बॉलिवूड चित्रपटसृष्टी गाजवलेली अभिनेत्री जेनेलिया देशमुखने आज मराठी चित्रपटांतून खऱ्या अर्थाने स्वतःला सिद्ध केले आहे. मग चित्रपटातील अभिनय असो वा अनेक पुरस्कार सोहळे वा मुलाखती प्रत्येक ठिकाणी ती मराठीमध्ये बोलते हे वाखाणण्याजोगे आहे. सोशल मीडियावर असो वा एखाद्या कार्यक्रमात जेनेलिया ज्या पद्धतीने लाडिक आणि अस्खलित मराठी बोलते त्याचे सर्वांनाच कौतुक वाटते. पण मुळात मुंबईत वाढलेल्या आणि अमराठी भाषिक पार्श्वभूमी असलेल्या जेनेलियाने इतके छान मराठी कसे आत्मसात केले? असा प्रश्न अनेकांना पडतो.

### रितेश ठरला खऱ्या अर्थाने 'गुरू'

जेनेलियाच्या मराठी बोलण्यामागे सर्वांत मोठा हात तिचा पती, अभिनेता रितेश देशमुखचा आहे. एका मराठी कुटुंबात लग्न केल्यानंतर जेनेलियाला घरातील माणसांचा सहवास लाभलाच शिवाय तिने स्वतः ही भाषा शिकण्यास सुरूवात केली. अगदी घरात मुलांना मम्मी-पप्पा नव्हे तर आई-बाबा म्हणण्यास शिकविले. रितेशने तिला केवळ शब्दच शिकविले नाहीत, तर भाषेतील हेल आणि उच्चार स्पष्ट होण्यासाठीही मोठी मदत केल्याचे म्हटले जाते. अनेक मुलाखतींमध्ये जेनेलियाने स्वतः कबूल केले, की रितेशने तिचा आत्मविश्वास वाढविला.

एका मुलाखतीत रितेश-जेनेलिया आपल्या खासगी आयुष्याबद्दल बोलत होते. त्यावळी रितेशने आपल्या कॉलेज लाईफ क्रशबद्दल सांगितले होते. तो मराठीमध्ये म्हणाला होता, की कॉलेजमध्ये मला एक मुलगी आवडायची. मी तिला कधी बोललो नाही... यावर लगेच जेनेलिया म्हणते.. 'बरे झाले...' हे उद्गार काढताच उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. सांगायचा उद्देश असा, की ती उत्तमपणे मराठी समजेत आणि खूप छान पद्धतीने बोलते देखील.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# श्री पुष्टिपती गणपती बाप्पांची कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैष्णवभक्तराज प्रहलादला सांगताना म्हणतात, की एकदा शुक्राचार्यांचे शिष्य 'दुर्मती'ने गुरूकडून श्री जगदंबा भवानीच्या 'नवाक्षरी मन्त्र' उपदेश घेऊन आदिशक्ती चंडिकाचे घोर तप सुरू केले. दुर्गा परमेश्वरी सिंहवाहिनी होऊन दुर्मतीसमोर प्रगट झाली. वर मागण्यासाठी विचार करती झाली. खलबुद्धीचे मूर्तिमंत असलेला दुर्मती नामभूषित दैत्यने देवीकडे त्रैलोक्य विजय प्राप्त होऊन सर्वत्र माझेच राज्य प्रस्थापित होऊन युद्धात अजेय होण्याचा वरदान मागितला. जगदंबा तथास्तु म्हणून शक्तीलोकात निघून गेल्यावर दुर्मतीने सर्वत्र उच्छाद माजवला. शिव, विष्णू आदी सर्व देवांना त्यांची निवास्थाने सोडावी लागली व भूलोकी हिमालयात आश्रयाला आली. शक्तीलोक सोडून जगदंबा शिवासोबत विहार करत असत नारदाने तेथे येऊन दोघांना दुर्मती वधाची इच्छा धरून आदिदेव गणेशांचे आराधना करण्याचे सुचविले. भगवान गणेश आपणास पुत्रवत होऊन ते शीघ्र ऐकून असुरनाशासाठी काहीतरी उपाय करतील, असे आम्हाला वाटते, असे सांगितले. शिवशक्तीने गणेशांची आराधना गंगा नदीकाठी सुरू केली. '

आदीदंपत्ती शिवशक्तीने गणेशांच्या षोडशाक्षरी मंत्राने गणेशारधना सुरू केली. शतवर्षं जप तप करून जगतपिता जगज्जननीसमोर जगाचे आदीकारण परब्रह्म श्री गणेशरूपात प्रगटले, त्यांना बघून शिवशक्तीने त्यांची स्तुती केली व भगवान गणेश प्रसन्न होऊन शिवशक्तीकडे वर मागण्यास सांगतात. शिवशक्ती गणेशांकडे त्यांच्याकडे आपल्या पुत्र रूपात अवतार घेऊन आम्हाला कृतकृत्य करावे, संसारहितासाठी दुर्मतीचा नाश करण्यासाठी तुम्ही असे करावे हाच वर आम्ही मागत आहोत. श्रीगणेश तथास्तु म्हणून अंतर्धान पावले.

शक्ती, पार्वतीरूपात शिवासोबत हिमालयाजवळ गंगाकिनारी वैशाखस्नान मासव्रत करीत होती, रोज नेम धरून दुर्वा मंदार आदीने मातीची गणेशमूर्ती करून आपल्या पती महादेवासोबत



त्याची पूजा करत होती, वैशाख पौर्णिमेला ब्राह्म मुहूर्तावर पार्वतीपरमेशने स्नान करून, शिवाने मातीची गणेशमूर्ती तयार करून दोघांनी त्यांची उषःकाली पूजा केली आणि मंत्रजप करत ध्यानस्थ बसले. सूर्योदयाच्या पहिला किरण आकाशात दिसता क्षणी उमामहेश्वर पूजित मृन्मयी मूर्तीतून भगवान गणेश शिवपुत्र रूपात प्रगट झाले आणि माता, पिता म्हणत शिवपार्वतीला हाक मारू लागले, की पूर्वी केलेल्या तपाचे फलपूर्ती हेतू मी तुमचा मुलगा म्हणून आलेलो तरी माझे पिता म्हणून माझे सदा रक्षण करा' असे श्रीगणेश म्हणाले. पार्वती-शंकरने गणेशांचे अथर्वशीर्षने स्तुतिकरून प्रणाम केला आणि पुत्र म्हणून त्याला स्वीकार सहज व्हावा म्हणून श्रीगणेशाने आपल्या मायेने शिवपार्वतीला मोहित केले व त्यांच्या गणेशाप्रती पुत्रभाव जागृत होऊन त्यांनी पुत्र रूपात स्वीकारले. पुढे शिवाने गणेशांचे जातकर्म आदी सर्वे संस्कार हर्षयुक्त करून आपल्या पुत्रासाठी उत्तम स्त्री शोधण्यास सुरूवात केली. तेव्हा लक्ष्मीनारायणची कन्या श्री देवीपुष्टिच योग्य असल्याचे ठरले व गणेशांचे विवाह पुष्टीसोबत मोठ्या थाटात शिवपार्वती आणि लक्ष्मीनारायणने केला व श्रीगणेश 'पुष्टिपती' म्हणून नामाभिधानने गौरविण्यात आले.

विवाह झाल्यानंतर एकदा सूर्यपुत्र शनी देव पुष्टिपती गणेशांच्या दर्शनासाठी कैलासावर आले, पण दर्शन घेण्यासाठी धजावत होते. कैलासस्वामीनी पार्वतीने त्यांचे तसे वागणे पाहिले व स्वतः शनी देवांना येऊन विचारू लागली, शनी देवांना त्यांना सूर्यपूजेत रमलेले असताना आपली पत्नी सर्वालंकार लेयुन प्रणयातूर झाली पण दोन तास होऊनही ध्यानस्थ शनी आले नाहीत म्हणून पत्नीने ज्यांच्यावर दृष्टी टाकाल त्यांचे मृत्यू होईल, असा शाप देऊन शनी देवांना सोडून गेली. अशा शाप घेऊन मी श्रीगणेशांचे दर्शन घेतले तर अरिष्ट होईल म्हणून मी येत नाही. तेव्हा जगन्माता पार्वतीने शनी देवांना समजवले, की श्रीगणेश मंगलमूर्ती आहेत त्यांच्याकडे कधीच काही अमंगळ होत नाही. तुम्ही निःसंकोचपणे त्यांचे दर्शन घ्या., असे समजावल्यावर शनीदेव श्री पुष्टिपतीचे दर्शन घेण्यास गेले. शनी देवाची दृष्टिपडताच श्री पुष्टिपती गणेशांचे सुंदर नरमुख गायब झाले, असे होताच सर्वत्र हाहाःकार झाला. शनी देवांना अगदीच निराशा झाली. पण एका प्रहरानंतर पुष्टिपतीचे गजमुख रूप स्वतः प्रगट झाले. श्रीगणेशांची लीला बघून शनीदेवांना धन्यता वाटली व नतमस्तक होऊन भक्तीयुक्त गणेशाची स्तुती केली, पुष्टिपतीने वर मागण्यास सांगितले व शनीने श्रापमुक्तीचा वर मागितले व त्याच्या क्रूरदृष्टीने मृत्यू होण्याची मुक्ती दिली. तेथे श्रीविष्णू आले असता शनी देवाने त्यांच्याकडून गणेशोपासना, एकाक्षरमंत्रविधान आणि कवचादि उपदेश घेऊन निघून गेले. एकदा पुष्टिपती गणपतीने आपल्या पिता सदाशिव यांना ते असे वनवासी होण्याचे कारण विचारले असता सदाशिव यांनी असुरराज दुर्मतीच्या मुले सर्व देवांचे सर्व ऐश्वर्य नाश होऊन सगळे वनवासी झाल्याचे सांगितले. तेव्हा सर्व ऐकून भगवान पुष्टिपती गणेश क्रोधीत झाले व म्हणाले 'मी आपला पुत्र असताना आपली ही अवस्था? आपण निश्चीन्त रहा पिताश्री मी त्या दैत्याचा नाश करेन आणि सर्व पुनः क्षेम करेन.' असे म्हणून भगवान मूषकारूढ होऊन दुर्मतीच्या नगराकडे आले.



# देवाचा फोटो मोबाईल स्क्रीनवर लावणे शुभ की अशुभ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजकाल बहुतेक लोक त्यांच्या मोबाईल फोनच्या स्क्रीनवर देवाचा फोटो लावतात, काही श्रद्धेचे प्रतीक म्हणून, तर काही सुरक्षिततेच्या भावनेसाठी. पण त्यांच्या मोबाईल फोनवर देवाचा फोटो लावणे खरोखर योग्य आहे का? धार्मिक ग्रंथ आणि ज्योतिषशास्त्रीय दृष्टिकोन या मुद्द्यावर भिन्न आहे.

पंडितांच्या मते मोबाईल फोन हे एक वैयक्तिक आणि व्यावहारिक उपकरण आहे, जे दिवसभर विविध कारणांसाठी वापरले जाते, कधीकधी आवश्यक आणि कधी-कधी अशुद्ध कारणांसाठी. म्हणून त्यावर देवाचा फोटो असणे कधी-कधी अनादर मानले जाते. मोबाईल फोन टाकणे, तो चुकीच्या ठिकाणी ठेवणे किंवा शौचालयासारख्या ठिकाणी हातात घेऊन जाणे हे पवित्र प्रतिमेचा अपमान मानले जाऊ शकते.

### मोबाईल स्क्रीनवर देवाचा फोटो

दुसरीकडे काहीजण ते भक्तीचे माध्यम मानतात. त्यांचा असा विश्वास आहे की देवाचा फोटो पाहिल्याने शांती, सकारात्मकता आणि सुरक्षिततेची भावना येते. डिजिटल युगात, मोबाईल फोन नेहमीच तुमच्यासोबत असतात. त्यामुळे बरेच लोक असा विश्वास करतात, की ते 'डिजिटल मंदिर'सारखे श्रद्धा टिकवून ठेवण्याचा एक नवीन प्रकार आहे.

# आयुष्यात 'या' ४ गोष्टी जमल्या तर दुःख वाटेला येणार नाही : आचार्य चाणक्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या जीवन अनुभवांवर आणि सखोल ज्ञानावर आधारित आचार्य चाणक्यांनी त्यांच्या 'चाणक्य नीती' या ग्रंथातून मानवी जीवनाच्या प्रत्येक लहान सहान बारकावे शिकविले. त्यांची तत्त्वे आपल्याला आपले जीवन कसे जगावे, संपत्ती, ज्ञान व बुद्धिमत्तेचा उपयोग कसा करावा हे शिकवितात. आपण आचार्य चाणक्यांनी सांगितलेल्या चार चांगल्या सवयींवर चर्चा करणार आहोत.

प्रत्येकाला आयुष्यात आनंदी आणि यशस्वी व्हायचे असते. कारण खाणे, पिणे, आवडत्या वस्तू खरेदी करणे, चित्रपट पाहणे, प्रवास करणे या सगळ्या गोष्टी आपण तेव्हाच करू शकतो जेव्हा आपण यशस्वी आणि आनंदी होतो. जर तुम्ही आनंदी राहिलात तर तुमच्या जीवनातील समस्या आपोआपच सुटतात. म्हणूनच आनंदी राहण्यासाठी संधी शोधणे महत्त्वाचे आहे. तर मग यासाठी कोणत्या गोष्टी आपण केल्या पाहिजेत त्याबद्दल जाणून घेऊया.

**पुढील सवयी तुम्हाला यशस्वी आणि आनंदी बनवितात-**

'दारिद्यनाशनं दानं शीलं दुर्गतिनाशनम्!
अज्ञाननाशिनी प्रज्ञा भावना भयनाशिनी'

आचार्य चाणक्य म्हणतात, की दान, चांगले वागणे, ज्ञान आणि श्रद्धा या गोष्टी आयुष्य सुधारायला मदत करतात. चांगल्या वागणुकीमुळे दुःख कमी होते, वाईट परिस्थिती (दुर्गती) सुधारते, बुद्धीने अज्ञान दूर होते आणि ईश्वरभक्तीने भीती दूर होते. हेही वाचा स्वतःच खरे करतात, हट्टी असतात अन् १, १०, १९, २८ जन्मतारखांचे 'वीक पॉईंट्स' तुम्हाला माहिती आहेत का?

चला, चाणक्याच्या या श्लोकाचा अर्थ सविस्तरपणे समजून घेऊया. दारिद्यनाशनं दानं

याचा अर्थ असा, की दान दिल्याने दारिद्य नष्ट होते. चाणक्य सांगतात, की जो मनुष्य नियमितपणे दान करतो, तो दारिद्यापासून मुक्त होतो आणि त्याला देवी लक्ष्मींचा आशीर्वाद प्राप्त होतो.

**शीलं दुर्गतिनाशनम्**

सद्गुण म्हणजे चांगले वर्तन, चांगली वागणूक आणि नैतिकता जीवनातील दुःख नाहीसे करते. याचा अर्थ असा, की सज्जन आणि चांगल्या चारित्र्याच्या व्यक्तीला समाजात कधीही तुच्छ मानले जात नाही.

**अज्ञाननाशिनी प्रज्ञा**

योग्य, सखोल ज्ञान, मनुष्याचे अज्ञान नष्ट करण्यास मदत करते.

**भावना भयंकराशिनी**

खरी भावना म्हणजेच श्रद्धा, विश्वास, भक्ती आणि सकारात्मक विचार, सर्व प्रकारची भीती नाहीशी करते.



# रामरक्षा मराठी अर्थासह!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमन्त्रस्य ।**
**बुधकौशिकऋषिः ।**
**श्रीसीतारामचन्द्रो देवता ।**
**अनुष्टुप् छ्न्दः । सीता शक्तिः ।**
**श्रीमद् हनुमान् कीलकम्।**
**श्रीरामचन्द्रप्रीत्यर्थे जपे विनियोगः ।**

कीलकम् आधारस्तंभ,कवच

**अर्थ :** या रामरक्षास्तोत्ररूपी मंत्राचा ऋषी (रचणारा) बुधकौशिक असून छंद (वृत्त?) अनुष्टुभ् आहे, माता सीता आणि श्रीरामचंद्र या देवता आहेत. सीता शक्ती आहे, हनुमानजी आधारस्तंभ आहेत आणि श्रीरामचंद्रांच्या प्रेमाने जपासाठी वापरला जावा म्हणून हा स्तोत्ररूप मंत्र निर्माण केला आहे.

**अथ ध्यानम् ।**
**ध्यायेदाजानुबाहुम् धृतशरधनुषम् । बद्धपद्मासनस्थम् ।**
**पीतं वासो वसानम् नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नम् ।**
**वामाङ्कारूढसीतामुखकमलमिलल्लोचनं नीरदाभम् ।**
**नानालङ्कारदीप्तं दधतमुरुजटामण्डनं रामचन्द्रम् ॥**
**इति ध्यानम् ।**

ध्यायेदाजानुबाहुं ध्यायेत् + आजानुबाहुं, नीरदाभम् नीरद म्हणजे मेघ, त्याच्यासारखी कांती असणारे श्रीराम, दधतमुरुजटामण्डनं दधतम् + उरू + जटामंडनं , दधतम् धारण करणारा, उरू विस्तृत, मोठ्या, जटामंडनं जटांनी सुशोभित असलेला.

**अर्थ :** आता ध्यानाची सुरुवात करू या. गुडघ्यापर्यंत हात असलेल्या, धनुष्यबाण धारण केलेल्या, बद्धपद्मासनात बसलेल्या, पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान केलेल्या, नुकत्याच उमललेल्या कमळाच्या पाकळीशी स्पर्धा करणाऱ्या प्रसन्न अशा श्रीरामांचे ध्यान करूया. त्याच्या डाव्या मांडीवर माता सीता बसलेली आहे, श्रीरामांची नजर तिच्या मुखकमलाकडे लागलेली आहे. श्रीरामांची कांती मेघश्याम आहे. शरीर निरनिराळ्या अलंकारांच्या शोभेने झळकत आहे. मोठ्या जटांमुळे त्यांचा चेहरा सुशोभीत झालेला आहे.

**चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् ।**
**एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ॥ १ ॥**

शतकोटिप्रविस्तरम् शंभर कोटी श्लोकांइतके विस्तृत, पुंसां पुरुषांची

**अर्थ :** श्रीरामांचे चरित्र शंभर कोटी श्लोकांइतके विस्तृत आहे. त्याचे केवळ एक अक्षरसुद्धा पुरुषाची मोठी पापे नष्ट करण्यास समर्थ आहे.

**ध्यात्वा नीलोत्पलश्यामं रामं राजीवलोचनम् ।**
**जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमण्डितम् ॥ २ ॥**

नीलोत्पलश्यामं नील + उत्पल + श्यामं, उत्पल कमळ, राजीव कमळ, जानकीलक्ष्मणोपेतं जानकी + लक्ष्मण + उपेतं, म्हणजे माता सीता आणि लक्ष्मण ज्याच्याजवळ आहेत असा.

**अर्थ :** नीलकमळासारखा सावळा रंग असलेल्या आणि कमळासारखे नेत्र असलेल्या रामाचे ध्यान करावे. सीता आणि लक्ष्मण ज्याच्या सान्निध्यात असून ज्याचे मस्तक जटारूपी मुकुटाने सुशोभीत आहे.

**सासितूणधनुर्बाणपाणिं नक्तंचरान्तकम् ।**
**स्वलीलया जगत्रातुमाविर्भूतमजं विभुम् ॥ ३॥**

सासितूणधनुर्बाणपाणिं स + असि + तूण + धनुर् + बाण + पाणिं, असि = तलवार, तूण = भाता, म्हणजे धनुष्यबाण आणि भात्याबरोबरच तलवारही हाती असणारे, नक्तंचरान्तकम् नक्तं + चर + अंतकम्, नक्तं रात्र, नक्तंचर निशाचर म्हणजे दानव, राक्षस, नक्तंचरांतकं राक्षसांचा नाश करणारा, जगत्त्रातुमाविर्भूतमजं जगत्रातुम् + आविर्भूतम् + अजम्, जगत्रातुम् जगत् + त्रातुम् , म्हणजे जगाच्या रक्षणासाठी , आविर्भूतम् स्वतःला प्रकट केले आहे, अजम् म्हणजे जन्मरहित आणि म्हणूनच मृत्युरहित सुद्धा. विभुम्- व्यापून उरणारा. या शेवटच्या दोन ओळींतील विशेषणे श्रीरामांच्या रूपाने अवतार घेणाऱ्या परमात्म्याला श्रीविष्णूंना लागू होतात.

**अर्थ :** आणखी एक म्हणजे मूलतः जन्मरहित व सर्वव्यापक असूनही त्याने जगाच्या रक्षणासाठी स्वतःस मर्यादित स्वरूपात सहज लीलेने प्रकट केले आहे. बाकी अर्थ सहज स्पष्ट होईल.

**रामरक्षाम् पठेत् प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् ।**
**शिरो मे राघवः पातु भालं दशरथात्मजः ॥ ४ ॥**

प्राज्ञः प्रज्ञावान, सूज्ञ पुरुष, पापघ्नीं पापाचा नाश करणारी (रामरक्षा) सर्वकामदाम् काम इच्छा. सर्व इच्छा पूर्ण करणारी (रामरक्षा) असा अर्थ

**अर्थ :** रामरक्षा पापांचा नाश करणारी व सर्व इच्छा पूर्ण करणारी असल्याने सूज्ञ लोकांनी तिचे पठण करावे.(दुसऱ्या ओळीपासून कवच सुरू होते) रघूच्या कुळात उत्पन्न झालेला राम माझ्या कपाळाचे रक्षण करो. दशरथाचा पुत्र कपाळाचे रक्षण करो.

**कौसल्येयो दृशौ पातु विश्वामित्रप्रियः श्रुती ।**
**घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ॥ ५ ॥**

मखत्राता मख म्हणजे यज्ञ, त्राता म्हणजे रक्षण करणारा,

**अर्थ :** कौसल्येचा पुत्र माझ्या दृष्टीचे रक्षण करो, विश्वामित्राला प्रिय (असलेले श्रीराम) माझ्या कानांचे रक्षण करोत, येथे विशेषणाची चपखलता लक्षात घेण्यासारखी आहे. श्रुतींसाठी विश्वामित्रांशी संबंधित विशेषणच का. कारण विश्वामित्रांनी श्रुतींद्वारे म्हणजे कानांद्वारे विद्येचे संस्कार श्रीरामांवर केले. यज्ञाचे रक्षण करणारे (श्रीराम) माझ्या नाकाचे रक्षण करोत तर सुमित्रेचे ज्यांच्यावर प्रेम आहे (श्रीराम) माझ्या मुखाचे रक्षण करोत.

**जिह्वां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवन्दितः ।**
**स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ॥ ६ ॥**

भग्नेशकार्मुकः भग्न + ईश + कार्मुकः, ईश शंकर, कार्मुक धनुष्य, शिवधनुष्य भंग करणारे (श्रीराम)

**अर्थ :** विद्येचा खजिना असलेले माझ्या जिभेचे रक्षण करोत (जीभ कारण तिच्या टोकावरच विद्या नर्तन करते असे मानतात) तर भरताला वंदनीय असलेले माझ्या कंठाचे रक्षण करोत. दिव्य शस्त्रास्त्रे असलेले माझ्या खांद्यांचे रक्षण करोत (खांद्यांचे कारण कदाचित काही अस्त्रे चालवण्यासाठी खांद्यांचा आधार घ्यावा लागत असावा). तर शिवधनुष्याचा भंग करणारे माझ्या भुजांचे रक्षण करोत (ज्या हातांनी शिवधनुष्य भंगले म्हणून हात).

**करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजित् ।**
**मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रयः ॥ ७ ॥**

जामदग्न्यजित् जमदग्निपुत्र परशुरामाला जिंकणारे श्रीराम

**अर्थ :** माता सीता यांचे पती माझ्या हातांचे रक्षण करोत (पतीचा एक अर्थ रक्षणकर्ता. सीतेचे रक्षण करणारा माझेही रक्षण करो असे काहीसे) तर परशुरामांना जिंकणारे माझ्या हृदयाचे रक्षण करोत. खर नावाच्या राक्षसाचा नाश करणारे माझ्या मध्यभागाचे रक्षण करोत तर जांबुवंताला आश्रय देणारे माझ्या नाभीचे रक्षण करोत.

**सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः ।**
**ऊरू रघूत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ॥ ८ ॥**

**अर्थ :** सुग्रीवाचे देव माझ्या कंबरेचे रक्षण करोत तर हनुमंताचे प्रभु माझ्या दोन्ही जांघांचे रक्षण करोत. रघुकुळातले उत्तम (पुरुष) व राक्षसांच्या कुळांचा नाश करणारे माझ्या मांड्यांचे रक्षण करोत.

**जानुनी सेतुकृत् पातु जङ्घे दशमुखान्तकः ।**
**पादौ विभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं वपुः ॥ ९ ॥**

वपुः शरीर

**अर्थ :** सेतू बांधणारे माझ्या गुडघ्यांचे रक्षण करोत तर दोन्ही पोटऱ्यांचे रक्षण दशमुख रावणाचा अंत करणारे करोत. बिभीषणाला राज्य व संपत्ती देणारे माझ्या पावलांचे रक्षण करोत तर श्रीराम माझ्या सर्व शरीराचे रक्षण करोत.

**एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत् ।**
**स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत् ॥ १० ॥**

**अर्थ :** (येथे कवच संपून फलश्रुती सुरू होते) जो पुण्यवान मनुष्य रामबलाने युक्त असा रक्षेचे (कवचाचे) पठण करेल तो दीर्घायु, सुखी, पुत्रवान, विजयी आणि विनयी होईल.

**पातालभूतलव्योम चारिणश्छद्मचारिणः ।**
**न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ॥ ११ ॥**

पातालभूतलव्योम चारिणश्छद्मचारिणः याची फोड पातालभूतलव्योमचारिणः + छद्मचारिणः अशी आहे. पातालभूतलव्योमचारिणः पाताळ, भूमी आणि आकाश या तिन्ही लोकांत संचार करणारे, छद्मचारिणः कपटी, मायावी खोटे सोंग घेणारे (राक्षस).

**दुसऱ्या ओळीचा अर्थ :** श्रीरामनामाने रक्षिलेल्या लोकांकडे असे (पहिल्या ओळीत वर्णन केलेले) मायावी आणि कपटी राक्षस नजर वर उचलून पण पाहू शकत नाहीत.

**रामेति रामभद्रेति रामचन्द्रेति वा स्मरन् ।**
**नरो न लिप्यते पापैर्भुक्तिं मुक्तिं च विन्दति ॥ १२ ॥**

**अर्थ** राम अथवा रामभद्र अथवा रामचंद्र या नावाने जो स्मरण करतो तो मनुष्य कधीही पापाने लिप्त होत नाही व त्याला सुखोपभोग आणि मुक्ति मिळतात.

**जगज्जैत्रेकमन्त्रेण रामनाम्नाभिरक्षितम् ।**
**यः कन्ठे धारयेत्तस्य करस्थाः सर्वसिध्दयः ॥ १३॥**

जगज्जैत्रेकमन्त्रेण जगज्जेत्रा + एकमन्त्रेण जग जिंकणाऱ्या एका मंत्राने, रामनाम्नाभिरक्षितम् रामनाम्ना + अभिरक्षितम् रामनामाने सर्व बाजूंनी रक्षण होते

**अर्थ :** सर्व जग जिंकणाऱ्या या रामनामरूपी एका मंत्राने मनुष्याचे सर्व बाजूंनी रक्षण होते. जो हा मंत्र कंठात धारण करतो (पाठ करतो) त्याच्या हातात सर्व सिद्धी येतात.

**वज्रपञ्जरनामेदमं यो रामकवचं स्मरेत् ।**
**अव्याहताज्ञः सर्वत्र लभते जयमङ्गलम् ॥**
**१४ ॥**

अव्याहताज्ञः म्हणजे त्याची आज्ञा कधीही मोडली जात नाही असा

**अर्थ :** हे कवच वज्राचा पिंजऱ्यासारखे अत्यंत संरक्षक असल्याने याला वज्रपंजर असे नाव आहे. या कवचाचे जो नित्य स्मरण करतो त्याची आज्ञा अबाधित राहते आणि त्याला सर्वत्र मंगलमय विजय मिळतो.

**आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः ।**
**तथा लिखितवान् प्रातः प्रबुद्धो बुधकौशिकः ॥ १५ ॥**

**अर्थ :** भगवान शंकरांनी ज्याप्रमाणे स्वप्नात येऊन ही रामरक्षा सांगितली त्याप्रमाणे सकाळी उठून बुधकौशिक ऋषींनी ती लिहिली.

**आरामः कल्पवृक्षाणां विरामः सकलापदाम् ।**
**अभिरामस्त्रिलोकानां रामः श्रीमान् स नः प्रभुः ॥ १६ ॥**

आरामः बाग, वन, विरामः शेवट करणारा, सकलापदाम् सकल + आपदाम् म्हणजे सर्व दुःखसंकटांचा, अभिरामस्त्रिलोकानां अभिरामः + त्रिलोकानां तिन्ही लोकांना आवडणारा, श्रीमान् श्रीमंत, स नः प्रभुः तो आमचा देव आहे

यापुढील (२० व्या श्लोकापर्यंतचे)वर्णन श्रीराम व लक्ष्मण या दोघांचे आहे.

**तरुणौ रूपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ ।**
**पुण्डरीक विशालाक्षौ चीरकृष्णाजिनाम्बरौ ॥ १७ ॥**

पुण्डरीक कमळ, विशालाक्षौ (कमळाप्रमाणे) मोठे डोळे असलेला, चीरकृष्णाजिनाम्बरौ चीर + कृष्णाजिन + अंबरौ, चीर वल्कले, कृष्णाजिन काळवीटाचे कातडे, अंबरौ वस्त्राप्रमाणे धारण करणारे.

**फलमूलाशिनौ दान्तौ तापसौ ब्रह्मचारिणौ ।**
**पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥ १८ ॥**

फलमूलाशिनौ फल + मूल + अशिनौ, म्हणजे फळे व कंदमुळे भक्षण करून राहणारे, दान्तौ इंद्रिये दमन करणारे, जितेंद्रिय

**अर्थ :** फळे व कंदमुळे भक्षण करून राहणारे, जितेंद्रिय, तपस्वी, ब्रह्मचारी असे हे दशरथाचे दोन पुत्र व एकमेकांचे भाऊ म्हणजे श्रीराम व लक्ष्मण.

**शरण्यौ सर्वसत्वानां श्रेष्ठौ सर्वधनुष्मताम् ।**
**रक्षः कुलनिहन्तारौ त्रायेतां नो रघूत्तमौ ॥ १९ ॥**

शरण्यौ सर्वसत्वानां सत्त्व म्हणजे प्राणी. याचा अर्थ सर्व प्राण्यांचे आश्रयस्थान

**अर्थ :** सर्व प्राण्यांचे आश्रयस्थान असलेले, सर्व धनुर्धारी योद्ध्यांमध्ये श्रेष्ठ, राक्षसांच्या कुळांचा वध करणारे रघुकुळातले श्रेष्ठ वीर, म्हणजे राम व लक्ष्मण, आमचे रक्षण करोत.

**आत्तसज्जधनुषाविषुस्पृशावक्षयाशुगनिषङ्गसङ्गिनौ ।**
**रक्षणाय मम् रामलक्ष्मणावग्रतः पथि सदैव गच्छताम् ॥ २० ॥**

आत्तसज्जधनुषाविषुस्पृशावक्षयाशुगनिषङ्गसङ्गिनौ आत्तसज्जधनुषौ + ईषुस्पृशावक्षयाशुगनिषङ्गसङ्गिनौ, पैकी आत्तसज्जधनुषौ आत्त + सज्ज + धनुषौ + ईषुस्पृशौ यातील आत्त- धारण केलेले, ईषुस्पृशौ ईषु म्हणजे बाण, बाण लावून सज्ज केलेले धनुष्य धारण केलेले (रामलक्ष्मण) असा एकूण अर्थ आणि अक्षयाशुगनिषङ्गसङ्गिनौ अक्षय + आशुग + निषङ्ग + सङ्गिनौ, यातील अक्षय म्हणजे कधीही न संपणारा, आशुग पुढे जाणारा बाण, निषङ्ग भाता, सङ्गिनौ जवळ असलेले, रामलक्ष्मणावग्रतः- रामलक्ष्मणौ + अग्रतः , अग्रतः= पुढे

**अर्थ :** बाण लावून सज्ज केलेले धनुष्य धारण केलेले तसेच पुढे जाणाऱ्या बाणांचा कधीही न संपणारा अक्षय भाता जवळ असलेले(श्रीराम व लक्ष्मण) माझ्या रक्षणाकरता मार्गामध्ये नेहमी माझापुढे चालोत.



(क्रमशः)

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)